# असा होता सिकंदर

इंद्रायणी सावकार

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**असा होता सिकंदर**
इंद्रायणी सावकार

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
इंद्रायणी सावकार
इ-१००१-५ मंत्री एलिगन्स,
एम. एस. पाल्या, बेंगलोर- ५६००७६
मो. नं. : ०९३२३८७४२२१, ०८०४१५७२९८१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३००/-

अत्यंत जिव्हाळ्याचे स्नेही
कश्मीरा व अनूप बगाई

## प्रस्तावना

अलेक्झांडरची चरित्रगाथा अनेक कारणांसाठी लोकप्रिय आहे. माझा दृष्टिकोन असा की इ. स. पू. चौथ्या काळात, म्हणजे प्राचीन काळात अनेक घटनांचा परिणाम होऊन एक अचाट, अफाट व असामान्य, जगात पूर्वी कधीच न दिसलेले व्यक्तिमत्त्व पटावर आले. म्हणून ही चरित्रकथा रंगतदार आहे. याच दृष्टिकोनातून मी ती वाचकांसमोर मांडली आहे. ही चरित्रकथा अनेक प्रश्नचिन्ह उसळवते. त्या प्रश्नचिन्हांची उत्तरे पुरवणे माझं काम नाही. उत्तरे या चरित्रकथेत कुठेतरी आहेत. ज्यांना हौस असेल त्यांनी शोधून काढावीत. मी फक्त त्याच्या घडणीचा इतिहास लिहिला आहे. म्हणून हे शीर्षक. 'जगज्जेता' नाही, 'महान' नाही, दुसरे कोणतेही शीर्षक नाही. कारण त्याची ही सर्व विशेषणे वादग्रस्त ठरली आहेत.

अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर त्याच्यावर अनेक पुस्तके त्याही काळात लिहिली गेली. चरित्रे लिहिली गेली. त्याच्या एकेका युद्धाचा विजय घेऊनही लिहिली गेली. त्याची प्रशंसा करणारी जेवढी पुस्तके लिहिली गेली तेवढीच त्याच्यावर टीकास्त्र झोडणारीही लिहिली गेली. हा ढाचा आजतागायत कायम आहे. हीच या चरित्रकथेची आकर्षकता असेल. ही व्यक्तिरेखा जशी पाहावी तशी दिसते. वेगवेगळ्या दृष्टिकोनाने पाहता तिच्यात वेगवेगळे रंग दिसतात. अलेक्झांडरचा मृत्यू झाल्यानंतर आजतागायत जगातील अनेक भाषांतून त्याच्यावर इतकी पुस्तकं लिहिली गेली की ती सर्व एकत्र केल्यास एक भलेमोठे ग्रंथालय भरून जाईल. पुस्तके आहेत तशीच चित्रे, पुतळे, चित्रपट व नाटकेही मुबलक आहेत. त्याची समग्र चरित्रे आहेत, एकेका लढाईवर पुस्तके आहेत व रणनीतीवरही आहेत. मॅनेजमेंटच्या आधुनिक शास्त्राचा जनकही अलेक्झांडरच असल्याचा– अभावितपणे अर्थात– निर्वाळाही अनेकांनी दिला आहे. याचा पुरावा सादर

करणाऱ्यांसाठी त्यांनी पुस्तके लिहिली आहेत. असे हे चरित्र रंगीबेरंगी तथा पैलूदार आहे.

जे जसे आहे तसे मी मांडले आहे. वर्तनाचे मूल्यांकन करण्याचे काम मी केलेले नाही. ते वाचकांनी करावे. तो दयाळू होता की दुष्ट? हुशार होता की उतावळा? शहाणा होता की आततायी? या प्रश्नांची उत्तरं वाचकांनी शोधावीत. अलेक्झांडरची व्यक्तिरेखा घडण्यात दोन फॅक्टर्सनी महत्त्वाच्या भूमिका पार पाडल्या. तो जन्मला त्या काळची ग्रीक संस्कृती-यात ग्रीक राजकारण, मानसिकता वगैरे सर्व काही आले आणि त्याचे संगोपन - त्याचे आई-वडील. संगोपनाची माहिती ठीक आहे. परंतु त्याच्याविषयीच्या इतर काही माहितीत बरेच विरोध आहेत. उदाहरणार्थ-एका इतिहासकाराने त्याने इजिप्तमध्ये ग्रंथालय स्थापित केल्याचा उल्लेख केला आहे तर दुसऱ्याने तेथे असलेले ग्रंथालय जाळून पोळून टाकल्याचे लिहून ठेवले आहे. ज्या ज्या देशात तो गेला तिथल्या देवांची पूजा केल्याचे उल्लेख आहेत. इतिहासही नेहमीच बिनचूक व काटेकोर असतो असे नाही. बहुधा नसतोच.

इतिहासाची संकल्पना अलेक्झांडरला माहीत होती. ॲरिस्टॉटलचा भाचा केलिस्थिनीस याला त्याने आपल्या राज्याचा इतिहास लिहिण्याची नोकरीच दिली होती. पण इतिहास लिहवून घेणारा माणूस स्वत:च्या चुकांचे वा अपयशाचे रेकॉर्ड मागे कशाला ठेवील? नाहीच ठेवणार. तेव्हा इतिहास म्हणजे सारवासारव. इतिहास म्हणचे खोटी प्रशंसा. अतिशयोक्ती. हा प्रकार आजतागायत रूढ आहे व त्याही काळी तो रूढ होता. हे लक्षात घेऊन संशोधकांनी अलेक्झांडरच्या लिखित इतिहासाबद्दल शंकाकुशंका उपस्थित केल्या आहेत. उदाहरणार्थ, भारतात तो आला व त्याने झेलम नदीच्या काठावर पुरू राजाशी युद्ध केले. यात जय कोणाचा झाला? पुरूचा की अलेक्झांडरचा? हे वादग्रस्त आहे. काही ग्रीक इतिहासकारांनी अलेक्झांडर जिंकला असे लिहिले आहे तर काहींनी तो हरला असे म्हटले आहे. आपल्याकडे काहीच लिहिलेले नाही. काही उडते उल्लेख तेवढे आहेत. मात्र 'चंद्रगुप्ताची व अलेक्झांडरची भेट झाली' असे प्लुटार्क म्हणतो; पण त्या भेटीचा तपशील देत नाही. चंद्रगुप्त पर्वतक राजाकडे सैन्याची मदत मागायला गेल्याचा उल्लेख बौद्ध साहित्यात

आहे. हे उल्लेख मी अर्थातच स्वीकारले आहेत व तपशीलासाठी कल्पनाशक्ती लढवली आहे.

एक छोटेसे वाक्य ग्रीक इतिहासात वाचायला मिळाले. 'आता तो उपरणे घालू लागला होता.' आता म्हणजे भारतातून परत गेल्यानंतर. आता घालू लागला म्हणजे काय? पूर्वी घालीत नव्हता? असेल नाहीतर नसेल. पण मी आणि प्रभाकरनं ठरवून टाकलं की ही वस्तू त्यानं भारतातूनच नेली. त्यानं अनेक वस्तू नेल्या. हत्ती, घोड्याच्या रिकिबी, गाई, धान्य व फळांच्या बिया आणि गेंड्याची एक जोडीदेखील चंद्रगुप्ताकडे त्यानं मागितली. चंद्रगुप्तानं ती सेल्यूकस निकेटोरला दिली व अशा तऱ्हेनं गेंडे तिकडे गेले. रोमन लोकांनी शिकारीची चित्रं काढली त्यात (आपला) गेंडा आहे. पण तर्क मी फक्त उपरण्यापुरताच लढवला. इतर सर्व माहिती पुस्तकातून घेतली. तर्कही असा की ग्रीक लोक टोगा ऊर्फ सदरा किंवा अंगरखा घालीत होते. त्यांना उपरणं कशाला हवं होईल? प्राचीन काळात भारतामध्ये शरीर झाकण्यासाठी ऊर्ध्व वस्त्रं ऊर्फ उपरणीच वापरत होते. बायकाही उरोजपट्ट्यावर उपरणं अंगभर लोटून घेत होत्या. अलेक्झांडरनं रत्नांचा कशिदा केलेला एक अंगरखा अंभीला भेट म्हणून दिल्याची नोंद आहे. अंभीनं काय दिलं याची नोंद अर्थातच नाही कारण आपण काही लिहून ठेवलंच नाही.

✦

सिकंदर २३७२ वर्षांपूर्वी जन्मला आणि २३३९ वर्षांपूर्वी, वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी त्याची जीवनयात्रा संपली. पण एवढ्या अल्पशा जीवनकार्यानेही एवढे अफाट कुतूहल निर्माण केले. जगातील सर्व संस्कृतींवर त्यानं ठसा उमटवला तो आजतागायत पुसला गेला नाही. कसा उठवला? काय प्रकारचा ठसा उमटवला? याबद्दलचे संशोधन अथांग आहे.

सिकंदरानं ठसा उमटवला तो ग्रीक संस्कृतीचा उमटवला. सिकंदरमध्ये जे असंख्य, अफाट व अचाट गुण संचारले ते ग्रीक संस्कृतीमुळे आले. त्याची गुणवत्ता त्याचे वडील यांच्या संगोपनामुळे घडली व त्याचं मन त्याची आई ऑलिंपियास हिनं घडवलं. परंतु एकंदरीतच त्याची व्यक्तिरेखा घडली ती ग्रीक संस्कृतीमुळे. सिकंदरला ग्रीक संस्कृतीपासून अलग करता येणार नाही. म्हणून सिकंदराला समजून घेण्यासाठी तत्कालीन ग्रीक संस्कृतीचं मी भरपूर वाचन केलं.

आपण कोण आहोत व कसे घडलो, याचा स्वत: सिकंदराने विचार केला नाही. तेवढा त्याला वेळच नव्हता. मरेपर्यंत त्याची घडण चालू होती. तो 'टिपिकल' ग्रीक नव्हता. रूपानं होता. नाकावरून तर ग्रीक म्हणून लगेच ओळखू येत होता. ग्रीक लोकांची नाकं मोठी, सरळ व टोकेरी; पण नाक व कपाळ यांच्यामध्ये खोबण नसे. कपाळाची रेषा सरळ पुढे नेली की नाकाची रेषा झाली. ग्रीक संस्कृतीनंतर रोमन संस्कृती आली. रोमन लोकांची नाकंही सरळ, मोठी व टोकेरी. पण कपाळ व नाक यांच्यामध्ये स्पष्ट खोबण. कपाळ कुठे संपतं व नाक कुठे सुरू होतं हे स्पष्ट कळायचं. नाकांवरूनच ग्रीक व रोमन ओळखू यायचे. एरव्ही एकसारखेच तगडे, काळ्या केसांचे व निळ्या डोळ्यांचे.

ग्रीक लोक फिलीपला ग्रीक समजत नसत. 'मेसिडोनियन' असा त्याचा उपमर्दकारक उल्लेख करीत. हा तिरस्कार अलेक्झांडरच्या वाट्याला येऊ नये अशी फिलीपला तळमळ होती. म्हणून त्यानं अलेक्झांडरच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवलं होतं. त्याचं शिक्षण ॲरिस्टॉटलच्या हाती सोपवलं होतं.

पण या दक्षतेचा परिणाम उलटाच झाला होता. अलेक्झांडर प्रकर्षानं ग्रीक राहिला नव्हता. इजिप्त, पर्स, झांग्रीया (तुर्कस्तान), बोक्ट्रिया (अफगाणिस्तान) व अर्थात इंडिया-भारत अशा अनेक संस्कृतींचा तो चाहता झाला होता. किंबहुना नवीन देश पादाक्रांत करण्याची त्याची ऊर्मी जेवढी दुर्दम्य होती, तेवढीच नवीन संस्कृती आत्मसात करण्याची व तो सांस्कृतिक ठेवा आपल्या लोकांपर्यंत पोहोचवण्याची त्याची अंत:प्रेरणाही अविचल होती. भारतीय संस्कृतीतले अनेक स्रोत त्यानं पश्चिमेपर्यंत पोहोचवले. त्यामुळे तो संकुचित अर्थानं ग्रीक राहिला नाही. 'बहुसांस्कृतिक' झाला. त्याच्या देशातील काही स्वदेशीवादी लोकांच्या दृष्टीनं हा दोष ठरत होता व तशी ही टीकाही ते करीत होते. अलेक्झांडर ज्या संस्कृतीत वाढला त्या संस्कृतीला इतिहासकार नाव देतात 'अथेनियन कल्चर.' अथेन्सची संस्कृती व अलेक्झांडरच्या मृत्यूनंतरच्या सांस्कृतिक पर्वाला नाव देतात 'हेलेनिस्टिक.' जग जिंकण्याची इच्छा झाली म्हणून अलेक्झांडरला 'जगज्जेता' ही पदवी मिळाली. तत्पूर्वी त्यानं अनेक युद्धं जिंकल्यामुळे 'महान'- 'अलेक्झांडर द ग्रेट' तो झालाच होता; परंतु अलीकडच्या इतिहासकारांनी केलेलं त्याचं मूल्यांकन लक्षात घेता 'सांस्कृतिक पर्व-निर्माता' असं एक नाव त्याला देतात

आणि तेच त्याचं खरं नाव ठरेल. त्याचा एक महत्त्वाचा विक्रम हा की डॅन्यूब नदीच्या खोऱ्यात– आजच्या जर्मनीत संस्कृतीचा पहिला झोत त्यानं नेला. पण हे ऋण मान्य केल्याच्या खुणा नाहीत. ज्यूलियस सीझरनं गॉल ऊर्फ फ्रान्समध्ये संस्कृती नेली हे ऋण फ्रान्स मान्य करतो; पण जर्मनीकडून असं काही ऐकलेलं नाही. बहुधा अलेक्झांडरच्या स्वारीच्या आधी इथं संस्कृती नव्हती हे त्यांना मान्य नसावं.

अलेक्झांडरची जगज्जेता होण्याची महत्त्वाकांक्षा रास्त होती की वेडेपणा होता? त्यानं भारत जिंकला की नाही? भारत-विजयाचा त्यानं लिहून घेतलेला इतिहास खरा आहे की चक्क भूल आहे? असे अनेक सवाल इतिहासकारांनी उठवले आहेत. भारतीय इतिहासकार अलेक्झांडरला कमी लेखतात. भारतातल्या राजांनी त्याला पळवून लावला म्हणतात तर पाश्चात्त्य इतिहासकारांचा दावा आहे की त्यानं बियास नदीपर्यंतचा भारताचा भाग काबीज केला. इतिहासातील सर्वच घटनांसंबंधी अशी परस्परविरोधी मतं व प्रमेयं तयार करण्यात आली आहेत. जॉन केनेडींच्या वधाचा प्रसंग घ्या. विशाल जनसमुदायाच्या अंगरक्षकांच्या आणि इंटेलिजन्स अधिकाऱ्यांच्या साक्षीनं घटना घडली. पण कोणी केली? कशी केली? याचा निकाल आजतागायत लागलेला नाही. दर वर्षी वेगवेगळी मतं ठासून मांडणारी पुस्तकं प्रसिद्ध होताहेत. डायना- मृत्यूचे गौंडबंगालही याच पठडीतले. वर्तमानकाळातील घटना जर इतक्या अतर्क्य व असिद्धेय असू शकतात तर सिकंदरचे हो काय? तो इ.स.पू. ४०० वर्षांतील काळात होऊन गेला. म्हणून या प्रश्नांची उत्तरे सादर करण्याचा प्रयत्न मी करणार नाही.

सिकंदरचे पोर्ट्रेट सादर करणे एवढीच माझ्या कार्याची व्याप्ती असेल पण तो पोर्ट्रेट कसा? हारासाठी खुडलेल्या गुलाबासारखा नाही. लांब देठावर डुलणाऱ्या, पानांच्या कोंदणात बसलेल्या गुलाबासारखा–ग्रीक संस्कृतीच्या कोंदणात सिकंदराचा तो पोर्ट्रेट असेल. 'चिरंजीवी व्यास महर्षी' मध्ये महाभारतकालीन जनजीवन, कायदे व सामाजिक मानसिकता यांचे चित्रण मी पेश केले. 'सिकंदर' मध्ये तत्कालीन जगाची संस्कृती, आचारविचार व रिवाज यांचे दर्शन मी घडवणार आहे. अर्थात ही पार्श्वभूमी असेल. अग्रभागी ठळकपणे सिकंदर असेल.

सिकंदर जेवढा महत्त्वाचा आहे तेवढेच त्याच्या भोवतालचे सांस्कृतिक कोंदणही महत्त्वाचे आहे. ग्रीक संस्कृती ही जगाच्या इतिहासातील अभूतपूर्व घटना

आहे. जगातले पहिले सांस्कृतिक आश्चर्य हेच आहे. जेवढी म्हणून शास्त्रे आजच्या जगात आहेत त्यातल्या ९०% शास्त्रांचा उगम ग्रीक संस्कृतीत झाला. इतिहासपूर्व नवव्या शतकापासून या देशात शास्त्रज्ञ, गणिततज्ज्ञ, लेखक, कवी, नाटककार, इतिहासकार, चित्रकार, शिल्पकार, नगररचनाकार असे अनेक लोक झाले. त्यांच्या अनेक पिढ्या झाल्या. विशेष म्हणजे या सर्व शास्त्रांचा व घटनांचा इतिहास त्यांनी लिहून ठेवला. आपलाही प्राचीन इतिहास उज्ज्वल आहे, पण लिखित नाही. लिपी आली चंद्रगुप्ताच्या काळाल. भूर्जपत्रं, ताडपत्रं व कापड यांच्यावर हस्तलिखित लिहून ठेवण्याचे काम अशोकाच्या काळात सुरू झाले. तोवर ग्रीसमध्ये पुस्तकांची दुकानं व ग्रंथालयं स्थापित झाली होती. ॲरिस्टॉटलने दीडशे ग्रंथ लिहिले. युरिपिडीस व ॲरिस्टोफेन्स यांनी प्रत्येकी नव्वदच्या वर शोकांतिका लिहिल्या व रंगभूमीवर सादर केल्या. परंतु जेमतेम सतरा-अठराच उपलब्ध आहेत. बाकीच्या ग्रंथकारांचीही हीच स्थिती झाली असावी. बरेचसे ग्रंथ गहाळ झाले असावेत असा तर्क आहे. कादंबरीचा विस्तार प्रमाणाबाहेर न वाढवता मी या सांस्कृतिक आश्चर्याची थोडीफार माहिती दिली आहे. जोवर सिकंदराचा हा सांस्कृतिक वारसा आपण समजून घेत नाही तोवर सिकंदरची महानता आपल्याला उमजणार नाही. 'जग जिंकायला गेला आणि मेला!' एवढेच या व्यक्तिरेखेचे स्वरूप नाही. सिकंदरच्या व्यक्तिरेखेला अनेक पैलू आहेत. त्याच्या मानसिकतेच्या घडणीतले अनेक घटक ग्रीक इतिहासाने जपून ठेवले आहेत. त्याचे माता-पिता, जिवलग मित्र हाफेष्टियन, गुरू ॲरिस्टॉटल अशा अनेकांच्या प्रभावामुळे त्याची व्यक्तिरेखा घडली. ग्रीक इतिहासाच्या महासागरातून मी हे घटक वेचून काढले आहेत व 'समग्र' सिकंदर सादर केला आहे. 'असा होता- सिकंदर' एवढेच मला स्पष्ट करायचे आहे.

**- इंद्रायणी सावकार**